# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
Email ID : education.nmc@gmail.com

जा.क्र.शि.वि./ 3102 /2014
दि.16/08/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापीका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– बालकुमार साधना दिवाळी अंक 2014 च्या प्रती खरेदी करण्याबाबत.**

**संदर्भ :– 1) मा. श्री. महावीर माने शिक्षण संचालक,(प्राथ.) महाराष्ट्र राज्य पूणे–1 यांचे कार्यालयीन पत्र क्र. संकिर्ण / 2014 / 12050 / ड 516 दि. 02.08.2014.**
**2) श्री. विनोद शिरसाठ, संपादक, साधना साप्ताहीक यांचे दि. 23.07.2014**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. श्री. महावीर माने शिक्षण संचालक,(प्राथ.) महाराष्ट्र राज्य पूणे–1 यांनी संदर्भिय पत्राव्दारे कळविले आहे की, साधना साप्ताहीकाची सुरूवात जेष्ठ समाजसेवक व शिक्षण तज्ञ पुज्य सानेगुरूजी यांनी केली होती. सुजाण नागरीक घडण्यासाठी मुलांमुलींवर शालेय वयातच सुसंस्कार व्हावेत असा कटाक्ष होता. तसेच शालेय वयातच मुल्य जाणीवा व्हाव्यात व वाचन संस्कृती वाढावी यासाठी त्यांनी साधना ट्रस्टव्दारे मुलांसाठी साधना साप्ताहीक सुरू केले होते. यावर्षी साधना ट्रस्टच्या वतीने बालकुमार साधना दिवाळी अंकाचे प्रकाशन 10 सप्टेंबर 2014, रोजी होणार आहे. नामवंत लेखकांचे शालेय विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार लेखन असलेला हा अंक शाळेतील मुलांमुलींना घेण्याबाबत आवाहन करावे अशी विनंती साधना ट्रस्ट साप्ताहीकाचे संपादक श्री. शिरसाठ यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे.

हा दिवाळी अंक 36 पानांचा असून 25 रू. किंमतीचा हा अंक ना नफा ना तोटा या तत्वावर विद्यार्थ्यांना 10 / – रूपयांमध्ये देण्यात येतो.

साधना ट्रस्टव्दारे केलेली विनंती लक्षात घेता, शालेय विद्यार्थ्यांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध असलेला बालकुमार साधना दिवाळी अंक जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी मा. श्री. महावीर माने शिक्षण संचालक,(प्राथ.) महाराष्ट्र राज्य पूणे यांनी निर्देश दिल्याप्रमाणे आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना याबाबत सूचना देवून इच्छूक विद्यार्थ्यांकडून 10रू. प्रमाणे रक्कम गोळा करून आपल्या स्तरावरून दिवाळी अंक खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. मात्र अंक घेणे हे पूर्णपणे ऐच्छिक असून विद्यार्थ्यांवर त्याची कोणतीही सक्ती करण्यात येवू नये.

अंक खरेदीसाठी **साधना ट्रस्ट, 926 सदाशिव पेठ, पूणे 30**
दुरध्वनी क्र. 02024451724
**e mail :– <u>weeklysadhana@gmail.com</u>** या पत्यावर परस्पर संपर्क साधावा.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc